# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ६११ दिनांक २५.०७.२०२०

१. फिर्यादी महिला वय-४५ वर्षे धंदा-गृहीणी, रा.विरार पुर्व,ता.वसई, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि. २४/०७/२०२० रोजी सकाळी ०७.३० वाजताचे सुमारास फिर्यादी ह्या मॉर्निंग वॉक करुन घरी परत जात असताना फिर्यादी यांचे मागुन एक काळ्या रंगाची मोटार सायकल वरील अनोळखी दोन इसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष वयोगटातील मास्क लावलेले जाड इसमांनी येवुन मागील बसलेल्या इसमाने फिर्यादी यांचे गळ्यातील ३५,०००/- रुपये किंमतीची सोन्याची चैन जबरीने खेचुन मोटार सायकलीवर पळुन गेले म्हणुन **विरार पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. I ६७९/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३९२ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

२. फिर्यादी पुरुष वय २९ वर्षे, रा.कासा ता. डहाणू, जि. पालघर, यांनी फिर्याद दिली की, सन २०१७ पासुन ते दिनांक १५/०७/२०२० रोजी पावेतो यातील आरोपीत यांनी मयत याचा संसार सुखाचा होऊ न देता संसारात नेहमी ढवळाढवळ तसेच मारहाण व शिविगाळ करुन आरोपीत यांनी मयत याची पत्नी हिस ५ जुन २०२० रोजी त्यांचे घरी घेऊन जावून तीस मयत याचे पुन्हा घरी न पाठविता मयत यास शारीरीक व मानसिक त्रास देवून त्यास आत्महत्येस प्रवृत्त केले म्हणून **कासा पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. १२४/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३०६, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

३. फिर्यादी पुरुष वय ३६ वर्षे रा. कामण ता. वसई, जिल्हा पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.२१/१०/२०१७ ते दि.२०/०३/२०२० रोजी च्या दरम्यान आरोपीताची मातीची भरणी चालु असलेल्या बापाणे स. नं. ३६ हि. नं. ०१ क्षेत्रफळ ०.५९.७०, मध्ये चालु असतांना यातील १२ गुंठे पोटखराबा विक्री करणे आहे असे सांगुन फिर्यादी याचा विश्वास संपादन करुन त्याचे कडुन चेकने व रोखीने ७८,१२,०००/- रु घेवुन फिर्यादीचा अन्यायाने विशावासघात करुन सदरच्या रक्कमेचा अपहार केला म्हणुन **वसई पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. I २८६/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४२०, ४०६ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

४. फिर्यादी पुरुष वय-३८ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी, रा. नालासोपारा पुर्व ता वसई जि पालघर यांनी फिर्याद दिली की, दिनांक २३/०७/२०२० रोजी संध्याकाळी १७.३० वा.जे. सुमारास फिर्यादी यांचा मेहूनीचा मुलगा वय- १३ वर्षे, हा दि. २३/०७/२०२० रोजी संध्याकाळी १७.३० वा.चे सुमारास खेळण्यासाठी बिल्डींगच्या खाली गेला परंतू तो घरी परत आला नाही म्हणुन त्यास कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचे तरी अमिष दाखवुन अज्ञात कारणावरुन फुस लावुन पळवुन नेले असावे म्हणुन **तुळींज पोलीस ठाणे** गुन्हा रजि.क्र. I ६६३/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

५. फिर्यादी पोशि/८३२ आकाश नागो छानवाल नेम- अर्नाळा सागरी पोलीस ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि.२४/०७/२०२० रोजी १०.३० वाजता आरोपीत यांनी मा.जिल्हाधिकारी सो. पालघर यांचेकडील

राज्य शासनाने कोरोना विषाणुचा ( कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधक कायदा १८९७ दि. १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमीत केली आहे. त्याअनुषंगाने मनाई आदेश क्र/गृह/का.१/टे-३/मनाई आदेश/एस.आर.२७/२० दि.१२/०६/२०२० अन्वये दि. १२/०६/२०२० रोजी रात्रौ १२.०१ ते दि. ०९/०८/२०२० रोजी रात्रौ १२.०० वाजे पावेतो मनाई आदेश व लागू असल्याचे माहीत असतांना आरोपीत यांनी नियमापेक्षा जास्त लोकांना क्रिकेट सामने खेळण्यासाठी बोलावून मा.जिल्हाधिकारी सो. पालघर यांचे मनाई आदेशाचे व आपत्ती व्यवस्थापनाचे उल्लंघन केले म्हणुन **अर्नाळा पोलीस ठाणे** गुन्हा रजि.क्र. II २७३/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८,२६९,२७० सह आपत्ती व्यवस्थापन कायदा कलम ५१ (ब) सह साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ कलम २,३,४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

६. फिर्यादी वय-४५ वर्षे, व्यवसाय-नोकरी, ग्रामविकास अधिकारी चिंचणी ग्रामपंचायत, यांनी फिर्याद दिली की, दि.१७/०७/२०२० रोजीदुपारी १२.४५ वा.चे.सुमारास आरोपीत क्र. १ ते ५ हे चिंचणी गावातील असुन त्यांचा दिनांक-१७/०७/२०२० रोजी जे.जे.रुग्णालय लॅब येथुन प्रा.आ.केंद्र चिंचणी येथे कोरोना पॉझीटीव्ह रिपोर्ट आल्याने फिर्यादी व मा.तहसिलदार डहाणु, मा.गटविकास अधिकारी डहाणु, मा.तालुका वैद्यकिय अधिकारी व ग्रामपंचायतीचे सदस्य असे आरो. क्र.१ ते ५ यांचेकडे जावुन कोव्हीड केअर सेंटर येथे जाणे बाबत सांगितले असता आरोपीत यांनी फिर्यादी तसेच अधिकारी वर्गा सोबत हुज्जत घालुन व्हॉटसअॅप सोशल मिडीया वरती कोव्हीड-१९ संदर्भात चुकीचा संदेश व्हायरल करुन कोव्हीड केअर सेंटर येथे जाण्यास नकार दिला म्हणुन **वाणगांव पोलीस ठाणे** गुन्हा रजि.क्र. II ४८/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८, साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ कलम २,३ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ कलम ५१ (बी) प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.